म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ५६
१९२८
REFBK-0003514

ग्रं. सं. ठाणे
५६

तकमाला नं. २९

॥ व दत्त प्रसन्न ॥

(मराठी सातवी, इंग्रजी तिसरी व ट्रेनिंग कॉलेजकरितां)

# अमेरिकाखंडाचा सोपा भूगोल.

लेखक व प्रकाशक
वामन विष्णु गोसावी हेडमास्तर
मु० पो० वळसंग जि० सोलापूर.

REFBK-0003514

सन १९२७ इसवी.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत दोन आणे.

# प्रस्तावना

हल्लीं विस्तारपूर्वक लिहिलेलीं भूगोलविषयक पुस्तकेंच मंजूर असून मोठमोठ्या बाडांचें दडपण मुलांवर बळें लादलें जातें. त्यामुळें मुलांची होऊन नापासाची पाळी येते. इतकेंच नव्हे तर मुलें नाउमेद व हताश हा त्यांच्या जन्माचें नुकसान होतें. म्हणून आम्ही आपल्या शाळेच्या पद्धतीस अनुसरून सातव्या इयत्तेच्या ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या व इंग्रजी तिसऱ्या इयत्तेच्या उपयोगासाठीं हा अमेरिका खंडाचा सोपा भूगोल तयार केला आहे. याची भाषा अत्यंत सोपी, चटकदार व मनोरंजक असून रचना साधी व डौलदार आहे. विषय कारणिक पण संक्षिप्त असल्यामुळें मुलांवर ओझें न पडतां दोन महिन्यांत परीक्षेची तयारी होते.

यांत उत्तर अमेरिकेचें व दक्षिण अमेरिकेचें सामान्य वर्णन व देशवार विशेष वर्णन दिलें आहे. प्रसंगविशेषीं माहिती मनोरंजक व तुलनात्मक दिली आहे. कांहीं कांहीं माहिती तर इतर कोणत्याही पुस्तकांत न सांपडणारी अशी जास्त व महत्त्वाची यांत दिली आहे. यामुळें वेळ, श्रम व पैसा कमी लागून भरपूर ज्ञान होऊन भूगोलविषयांत होणारी विद्यार्थ्यांची कत्तल वांचून खात्रीनें यश मिळेल. तरी सर्व शिक्षक व विद्यार्थी यास आश्रय देवोत.

२६५ सदाशिव पेठ, पुणें.
ता. ५।२।२७.

वामन विष्णु गोसावी.
( पुस्तक कर्ता. )

१५२६ 3498

# अमेरिका खंडाचा सोपा भूगोल.

## उत्तर अमेरिका.

अमेरिका खंडाचे उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका असे दोन भाग आहेत. उत्तरेकडील भाग तो उत्तर अमेरिका व दक्षिणेकडील भाग तो दक्षिण अमेरिका. उत्तर अमेरिका सधन खंड आहे. सीमा—उत्तरेस—आर्तिक महासागर; पूर्वेस अटलांटिक महासागर, दक्षिणेस व पश्चिमेस पासिफिक महासागर; क्षेत्रफळ—८० लक्ष चौ. मैल ( आशियाच्या निंपट ); लोकसंख्या ११॥ कोट.

**स्वाभाविक रचना**—१ पश्चिमेकडील उंचवट्याचा प्रदेश. २ मधलें मैदान ३ अलेगानी पर्वताचा पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश ४ अटलांटिकच्या कांठचा सखल प्रदेश यांनीं हें खंड बनलें आहे. नदीच्या प्रवाहास उतार १ मैलास १ फूट आहे. पर्वत– राकीपर्वत पश्चिम किनाऱ्याशीं समांतर व अलेगेनी पर्वत पूर्व किनाऱ्याशीं समांतर आहे.

**आखातें व उपसागर**—मेक्सिकोचें, सेंटलारेन्सचें व कालिफोर्नियाचें अखात. हीं आखातें व बाफीन, हडसन हे उपसागर आहेत. ( फंदीच्या उपसागरांत भरतीची लाट ७०।७५ फूट उंच येते. व मेक्सिकोच्या आखातांत पाण्याचें उष्णतामान तांबड्या समुद्राइतकें ९० अंश असतें.

**सामुद्र धुन्या**—बेरीन, हडसन, बॅरोग्डेव्हिसन, बेलआईल.

**भूशिरें**—चदले, चार्लस, सेब्ल, कांद, हातेरास, फ्लातरी इ०,

**बेटें**—प्रीन्स एदवर्द ऐलंद, बानकोर्सऐलंद, अंतिकोस्ती, केपब्रिटन ऐलंद, लांगऐलंद, आल्युशियन, ग्रीनलंद, न्यू फौंदलंद, वेस्तइंदिया बेटें, बहामा बेटें, बर्म्यूदा बेटें, ग्रेटर अंतिलीस बेटें व लेसर अंतिलिस बेटें इ०

**द्वीपकल्पें**—नोवास्कोशिया, फ्लारिदा, आलियास्का, युकातान, खालचा-कालिफोर्निया.

**सरोवरें**—सुपीरिअर, हुरन, एरी, अंटारियो, मिशिगन, ग्रेटस्लेव्हलेक ग्रेटबेअरलेक, विनीपका, ग्रेटसाल्टलेक व निकाराग्वा हीं मुख्य होत. सुपीरिअर

सरोवर जगांत दुसऱ्या नंबरचें गोड्यापाण्याचें सरोवर आहे. ह्यास सुमारें २०० नद्या मिळतात. ( व्हिक्टोरियानिएंझा हें पहिल्या नंबरचें गोड्यापाण्याचें सरोवर आहे. ग्रेटसाल्टलेकचें पाणी समुद्राच्या दसपट खारें आहे.

**हवामान**—१० पासून ८० अक्षांशा पर्यंत हें खंड पसरलें असल्यामुळें पराकाष्ठेच्या थंड हवेपासून उष्ण हवेपर्यंत सर्व तऱ्हेची हवा यांत आहे. यांतील प्रदेशाला समुद्र दूर असल्यामुळें हवा विषम आहे. युनैतेदस्स्येत्स देशांत पूर्व पश्चिम पर्वत नसल्यानें वाऱ्याची दिशा क्रमानें न बदलतां एकदम बदलते म्हणून या देशांत हवा विशेष विषम आहे.

**पाऊस**—पूर्व किनाऱ्यावर पाऊस बराच पडतो. उत्तरेकडे कमी कमी होत जातो. दक्षिणार्धाच्या पश्चिम किनाऱ्यावर थोडा पडतो.

**उत्पन्न**—गहूं, तांदूळ, कापूस, तमाखू, मका, सातू, ओट.

**प्राणी**—सस्तन प्राणी कमी, वाघ, सिंह नाहींत. मासे पुष्कळ सांपडतात.

**खनिज संपत्ति**—तांबें, रुपें, लोखंड पुष्कळ, सोनें बरेंच. दगडी कोळसा मुंबई इलाख्या एवढ्या क्षेत्रांत विपुल सांपडतो. राकेल विपुल. **दळणवळणांचीं साधनें**—कानडा व युनायटेडस्टेटसमध्यें उत्तम आहेत. बाकींच्या देशांत मध्यम आहेत. रेल्वे पुष्कळ आहे.

**इतिहास**—१४९२ त कोलंबसानें अमेरिका शोधिली. उत्तर अमेरिका इंग्लंडच्या कॅबेट खलाशानें १४९७ त शोधून काढिली.

**नद्या**—अमेरिकेंत नद्या पुष्कळ आहेत त्या सखल प्रदेशांतून वाहातात म्हणून प्रवाह संथ व जलमार्गाच्या फार उपयोगी आहेत.

१ **मिसिसिपी-मिसूरी**-मिसिसिपीला सेंटलुईजवळ मिसुरी नदी मिळते. मिसिसिपी मेक्सिकोच्या आखातास मिळते. मिसिसिपी २५०० मैल व मिसुरी ३००० मैल लांब आहे. २ **सेंटलारेन्स**—ही सुपिरिअर, ह्यूरोन इ० पांच सरोवरांच्या प्रवाहाची नदी झाली आहे. उत्तर अमेरिकेंतल्या सर्व नद्यांच्या प्रवाहाइतकें ह्या एकट्या नदीच्या प्रवाहांत पाणी आहे. ही सेंटलॉरेन्सच्या आखातास मिळते. लांबी २००० मैल आहे. ३ **मेकेन्झी**—हिला अथाबास्काव ग्रेटस्लेव्हलेक या दोन्ही सरोवरांतील पाणी वाहात येऊन मिळते ही कानडांतून वाहाते व आर्क्टिक महासागरास मिळते. लांबी २५०० मैल आहे. ४ **रिओग्रँडडेलनॉर्टे**—ही राकी पर्वतांत उगम पावून युनायटेडस्टे-

ट्स व मेक्सिको या देशांतून वाहात जाऊन मेक्सिकोच्या आखातास मिळते. लांबी १८०० मैल. ५ कोलोरोडो—ही नदी युनायटेडस्टेट्स मधून वाहात जाऊन पासिफिक महासागरास मिळते. ही डोंगर फोडून वाहाते त्यामुळें कोठें कोठें हिचे तट मैल अर्धा मैल उंच आहेत. लांबी ११०० मैल. ६ यूकन— ही आलास्कांतून वाहून बेरिंगच्या समुद्रास मिळते. लांबी २०५० मैल आहे. ७ कोलंबिया—ही यूनायटेडस्टेट्समधून वाहून पासिफिक महासागरास मिळते. लांबी १४०० मैल आहे.

---

# उत्तर अमेरिकेंतील देशांचें विशेष वर्णन.

## १. ग्रीनलंड अथवा डॅनिश अमेरिका.

ग्रीनलंड म्हणजे हिरवी जमीन. त्यांत थंडी फार असते म्हणून झाडें पिकें बहुतेक होत नाहींत. यांतले मूळचे एस्किमोलोक आहेत. मासे धरणे हा त्यांचा मुख्य धंदा आहे. हे लोक सील माशाची चरबी खाऊन त्यावर निर्वाह करितात. व केसाळ कातडीं पांघरतात. **इतिहास**—ऐस्लंडमधील डेन्स लोकांनीं या देशांत १० व्या शतकांत वस्ती केली.

## २. कानडाचें राज्य.

**सीमा**—उत्तरेस आर्क्टिक महासागर; पूर्वेस अटलांटिक महासागर; दक्षिणेस युनाय० स्टेटस; पश्चिमेस—पासिफिक महासागर.

**विभाग**—१ अंटारियो ( वरचा कानडा. २ क्वीबेक ( खालचा कानडा ) ३ नोव्हास्कोशिया० ४ न्यूब्रन्सवीक. ५ मॅनिटोबा. ६ प्रीन्सएडवर्डबेट ७ आलबर्टा. ८ यूकन. ९ वायव्य प्रांत. १० ब्रिटिश कोलंबिया. ११ सस्कॉचिव्हान. **कानडा**—ओंटारीयो व क्वीबेक मिळून कानडा बनला आहे. **हवामान**—उत्तरेकडे फार थंड व दक्षिणार्धांत साधारण थंड आहे. एकंदरीनें हवा विषम आहे. **पिकें**—प्रदेश सुपीक असून त्यांत गहूं, मका, वाख व जंगल फार असल्यानें लाकूड याचें उत्पन्न फार आहे. **खनिज पदार्थ**—सोनें, तांबें, लोखंड, दगडी कोळसा, आस्बेस्टास ( आस्बेस्टासच्या तंतूंचीं वस्त्रें जळत नाहींत ) **व्यापाराचे जिन्नस**—( आयात—चहा, कापड, धातूचें सामान— ( निर्यात )—सोनें, तांबें, शिसें, गहूं, मासें, लाकूड. **इतिहास**—फ्रेंचांनीं

१६०८ त कानडांत वसाहत केली, व त्यांच्यापासून तहानें १७६३ त इंग्लिशांना मिळाला.

**शहरें**--टोरांटो सुंदर शहर असून येथें विश्वविद्यालय आहे. ओटावा कानडाची राजधानी, मॉंटरिऑल कानडांतील सर्वांत मोठें बंदर आहे. येथें व्हॅंकूव्हर पर्यंत जगांत मोठी अशी रेल्वे आहे. क्विबेक तटबंदीचें शहर येथें १७५९ त इंग्लिशांनीं फ्रेंचांचा पराभव केला. फ्रेडरिक-न्यूब्रन्सविक प्रांताची राजधानी, सेंटजान येथें जहाजें बांधितात. हालिफाक्स-नोव्हस्कोशिया प्रांताची राजधानी आहे. येथें इंग्लंडहून अमेरिकेस निघालेल्या आगबोटी प्रथम थांबतात. येथें मासे धरण्याचें काम फार चालतें.

## ३ न्यूफौंडलंड व लाब्राडोर.

राजधानी सेंटजॉन ह्या प्रदेशालगत समुद्रांत कॉडमासे फार सांपडतात. मासे धरणें हा मुख्य धंदा आहे. लोकसंख्या २॥ लक्ष. राजधानी सेंटजॉन.

## ४ यूनायटेडस्टेट्स.

हा देश अत्यंत धनाढ्य व सुधारलेला आहे. क्षेत्र-हिंदुस्थानच्या दुप्पट किंवा युरोपखंडाइतकें ( ३० लक्ष चौ. मैल ) लोक १०॥ कोट.

**स्वाभाविक रचना**—१ रॉकी पर्वताच्या उतरणीवरील प्रदेश. २ रॉकीपर्वताचा उंचवट्याचा प्रदेश. ३ अलेगेनीपर्वताचा उंचवट्याचा प्रदेश. ४ अलेगेनीच्या पूर्वेकडील मैदान. ५ मध्यमैदान. रॉकी व अलेगेनी पर्वताच्या लगतच्या प्रदेशांत सोनें, रुपें, लोखंड, राकेल व दगडी कोळसा विपुल सांपडतो. मध्यमैदान मिसिसिपीचें खोरें असल्यामुळें फार सुपीक आहे.

**नद्या**—पुष्कळ नद्या व इतका पाण्याचा पुरवठा कोणत्याही देशांत नाहीं. पूर्वेकडील नद्यांच्या प्रवाहांच्या शक्तीनें गिरण्या चालतात. **हवामान**-समुद्रालगतचा प्रदेश खेरीजकरून बाकीच्या प्रांतांत हवा विषम आहे. उत्तरार्धांत साधारण थंड आहे. व दक्षिणार्धांतील सखल प्रदेशांत साधारण उष्ण आहे. **उत्पन्न**-दक्षिणेस कापूस, तमाखू, तांदूळ, ताग; उत्तरेस मका, गहूं पिकतो. मेपल झाडाच्या रसाची साखर तयार करितात, देशांत जंगल असल्यानें लाकडाचें उत्पन्न बरेंच होतें.

**निर्यातमाल**-धान्य, गहूं, तमाखू, कापूस, मांस, राकेल, तांबे, लोखंड, व लोखंडीसामान; **आयातमाल**-रबर, साखर, कापड व कातडीं. **लोक**—

क्रं. ३४९८

इंग्लिश, जर्मन, नार्वेजिअन, आयरिश, शिद्दी, तांबडेइंडियन व चिनी. सर्व मिळून १०॥ कोटी आहेत. **राज्यव्यवस्था**-प्रजासत्ताक आहे. प्रेसिडेंट या मुख्य अधिकाऱ्याचा वर्षाचा पगार २। लाख आहे. ह्या देशांत ४९ संस्थानें आहेत. **इतिहास**-या देशांत इंग्लिशांनीं १७ व्या शतकांत वस्ती केली. पुढें १७६७ सालीं तेथें जाणाऱ्या चहावर कर बसविल्यामुळें इंग्लंड व युनायटेड-स्टेट्स यांच्यांत १७७५ त युद्ध होऊन १७७६ त हा देश स्वतंत्र झाला.

**शहरें**-राजधानी वॉशिंग्टन हें फार सुंदर शहर आहे. जॉर्जवाशिंग्टनच्या नांवावरून हें नांव पडलें आहे. न्यूयार्क--अमेरिकेंत सर्वांत मोठें शहर बंदर, व हें लंदन-च्या खालोखाल आहे. ब्रुक्लिन शहरास हें लोंबत्या पुलानें जोडलें आहे. हा पूल जगांत मोठा आहे. शिकागो हें अमेरिकेंत नंबर २ चें शहर आहे. येथें जंगी प्रदर्शन भरतें. सिन्सिनाटी--अनेक तऱ्हेचे कारखाने व मोठा व्यापार चालतो. वाटर्बरी--घड्याळें होतात. बॉस्टन--दुसऱ्या नंबरचें बंदर व हावर्ड विश्वविद्यालय आहे. सेंटलुई--व्यापार मोठा चालतो. फिलाडेल्फिया--परोपकार व शिक्षण संस्था याविषयीं प्रसिद्ध आहे. सानफ्रान्सिस्को--चिनी लोकांची वस्ती जास्त आहे. पिट्सबर्ग- लोखंड व दगडी कोळसा यांचें आगर. हें अमेरिकेंतलें बर्मिंगहामच होय. ज्यूनो आलास्का प्रांताची राजधानी.

**युनायटेडस्टेट्समधील मनोरंजक माहिती**—या देशांत दगडी कोळसा, लोखंड, सोनें, रुपें यांच्या प्रचंड खाणी आहेत त्यांतून दरसाल १२ कोटींचें रुपें व २८ कोटींचें सोनें निघतें. राकेलच्या ४० हजार विहिरी आहेत. या देशांत विंडबक नांवाचा पक्षी आहे; तो कोणत्याही प्राण्याच्या आवाजा-सारखा आवाज काढतो. या देशांत कारखाने फार मोठमोठे आहेत. कांहीं दुकानें इतकीं मोठीं आहेत कीं, त्यांत ४१४ हजार नौकर आहेत. हा देश जगांत पहिल्या नंबरचा संपन्न आहे. या देशाच्या तिजोरींत ४ अब्जांचा ऐवज शिल्लक आहे. देशांत कोट्यावधि सावकार पुष्कळ आहेत. रॉकफेलर नांवाचा राके-लचा व्यापारी होऊन गेला त्याची १ अब्ज संपत्ति होती. देशांत सर्व पुरुष सुशिक्षित असून शेंकडा ९० स्त्रिया सुशिक्षित आहेत. न्यूयार्क शहरांत ५० मजली इमारती आहेत. त्यावर चढण्या उतरण्यास विजेचे पाळणे केले आहेत. न्यूयार्क येथें एक ५५ पुरुष उंचीचा पुतळा आहे. या देशांत योसेमिटेदरी ६ हजार फूट खोल असून त्यांत ३६ फूट व्यासाचीं व

४० पुरुष उंचीचीं प्रचंड झाडें आहेत. एका झाडाचा बुंधा कुजला होता तो कापून काढून बोगदा केला आहे. त्यांतून गाड्या, घोडीं सहजीं जातात. या देशांत २० फूट व्यासाचा व ६० फूट उंच उडणारा प्रचंड जलस्तंभ [ ऊन पाण्याचा झरा ] आहे.

## ५ मेक्सिको.

क्षेत्र—हिंदुस्थानच्या अर्धे, लोकसंख्या ११। कोटी. **स्वाभाविक रचना**—मध्यभागीं उंचवट्याचा मोठा उभा प्रदेश असून दोहोंबाजूंस मैदानें आहेत **उत्पन्न**—मका, केळीं, किरमिजी दाणा...इ. वर्षांत मकेचीं ३।४ पिकें निघतात. **खनिजपदार्थ** –सोनें, रुपें, राकेल. **राज्यव्यवस्था**—प्रजासत्ताक. **शहरें**-राजधानी मेक्सिको. हें स्पानिश वसाहतीचें सुंदर शहर आहे. वेराक्रूज व आकापलको हीं मोठीं बंदरें आहेत.

## ६ मध्यअमेरिका.

या देशांत ज्वालामुखी पर्वत पुष्कळ आहेत. भूकंप फार होतात. यांत बाराही महिने पिकें होतात. उत्पन्न–साखर, कोको, कॉफी, नीळ; ग्वाटेमाला हांडूरास, ब्रिटिशहांडूरास, निकाराग्वा, साल्वादोर, व कोस्टारिका हीं लोकसत्ताक संस्थानें आहेत. ब्रि० हांडूरासची राजधानी बेलीझ.

## ७ वेस्त इंदिज बेटें.

कोलंबसास प्रथम हीं बेटें सांपडलीं तेव्हां त्याला हें हिंदुस्थानच वाटलें. पुढें हिंदुस्थान सांपडल्यामुळें हीं बेटें पश्चिमेस आहेत म्हणून ह्याला वेस्त म्हणजे पश्चिम इंडिज हें नांव दिलें. ह्या बेटांचे ३ समूह आहेत. ते बहामाबेटें, ग्रेटर अँटिलीज व लेसर अँटिलीज. **स्वाभाविक रचना**—पर्वतांचीं शिखरें समुद्रपृष्ठाच्यावर येऊन हीं बेटें झालीं आहेत. कांहीं बेटें पोंवळ्याच्या खडकांचीं बनलीं आहेत. वेस्तइंडिज बेटांत ज्वालामुखी फार आहेत त्यामुळें भूकंप नेहमीं होतात. लेसरअँटिलीज बेटांत सृष्टिसौंदर्य उत्तम आहे. **हवामान**–हवा उष्ण व दमट आहे. वादळें फार मोठीं व जोराचीं होतात. घरें उडून जातात. उन्हाळा व पावसाळा हे दोनच काळ असतात. **उत्पन्न**-ऊस, तमाखू, कॉफी, कोको, कापूस, साखर इ० **शहरें**-क्यूबाची राजधानी हॅव्हाना चिरुटा विषयीं प्रसिद्ध. जमेकाची राजधानी किंगस्टन.

# दक्षिण अमेरिका.

## ( सामान्य वर्णन. )

सीमा—उत्तरेस कारिबियन समुद्र व अटलांटिक महासागर; पूर्वेस अटलांटिक महासागर; पश्चिमेस पासिफिक महासागर. किनारा—कमीदंतुर असल्यानें दक्षिण अमेरिकेंत बंदरें कमी आहेत.

**स्वाभाविक रचना**—पश्चिमेकडील अँडीजचा उंचवट्याचा प्रदेश. मधलें मैदान व पूर्वेकडील उंचवट्याचा प्रदेश मिळून हें खंड झालें आहे. या खंडाचा निम्मा भाग सखल आहे. **पर्वत**—अँडीज पर्वताची रांग उत्तर दक्षिण आहे. ही रांग जगांत मोठी आहे. त्याचीं शिखरें कोटोपाक्सी व चिंबोराथो. फार उंच आकॉनकाग्वा हें आहे. कोटोपॅक्सी व आंटिसाना हे ज्वालामुखी पर्वत आहेत. **मैदानें**—सेल्व्हाज, पंपास व ल्यानोज इ० भूशिरें—पूर्वेस सेंटरोक व दक्षिणेस केप हॉर्न.

**आखातें**—व्हेनेजुएलाचें, डेरियनचें, ग्वायाक्वीलचें व पनामाचेंही आखातें आहेत. **बेटें**—चिलोई, फरनानडीज, ट्रिनीडाड, फाकलंदबेटें, स्तातेन, सौथजार्जिया, व तेरादेलफुईगो. **सरोवरें**—माराकायबो व तितिकाका. **उत्पन्न**—तांदूळ गहूं, धान्यें, कापूस, ऊस, कॉफी, भुईमूग, रबर, सिंकोना ( कोयनेल ) **प्राणी**—लामा ( उंटाची जात ), आलपाका, सुसर, साप, हमिंगबर्ड ( गुणगुणणारा भुंग्या एवढा प्राणी ), कौडंर ( मोठापक्षी ),

**नद्याः**—ओरिनोको, आमेझोन, लाप्लाटा, सान्फ्रान्सिस्को, पाराग्वे व उरुग्वे इ० **नद्यांचें वर्णन**—**ओरिनोको**—ही मैदानांतून १४०० मैल वाहाते. हिच्या मुखापासून वर १ हजार मैल वाऱ्याच्या जोरानें जहाजें जातात. **आमेझोन**—ही रुंदीनें जगांत मोठी नदी आहे. ही अंडीज पर्वतांत उगम पावून ४ हजार मैल पूर्वेस वाहात जाऊन अटलांटिक महासागरास मिळते. हिचें खोरें साऱ्या यूरोप खंडाएवढें आहे. हिची मुखाजवळ रुंदी २७० मैल आहे. मुखापासून १५० मैल समुद्रांत प्रवाह शिरला आहे. तेथपर्यंत समुद्रांतलें पाणी गोडें आहे. हिच्या साऱ्या खोऱ्यांत धान्य पिकविलें तर साऱ्या जगाला पुरेल. हिच्या कांठीं नेहमीं पाऊस कोठेंतरी पडतोच. म्हणून नेहमीं पूर येतो. २६०० मैल वर मुखांतून

आगबोटी जातात. काठचा प्रदेश गाळ सांचून सुपीक बनला आहे. हिला मदीरा व निग्रो ह्या नद्या मिळतात. हिची लांबी ४ हजार मैल आहे.

**सानफ्रान्सिस्को**—ही ब्राझील देशांतून वाहात जाऊन अटलांटिक महासागरास मिळते. हिची लांबी १८०० मैल आहे. **लाप्लाटा**—ही नदी पाराना व उरुग्वे ह्या नद्या मिळून झाली आहे. पाराना ही नदी व उरुग्वे ही नदी ब्राझिलियन पर्वतांत उगम पावून दक्षिणेकडे वाहात जातात. हिला पाराग्वे नदी मिळते.

# दक्षिण अमेरिकेंतील कांहीं देशांचें विशेष वर्णन.

दक्षिण अमेरिकेंत १२ देश आहेत. त्यांत कोलंबो, इक्वेदोर, ग्वायना, ब्राझील, पेरु, बोलेव्हिया, चिली, अर्जेनाईन, पाराग्वे, युराग्वे इ०

## १ पनामा.

**शहरें**—राजधानी पनामा, व कोलन हें बंदर पनामा कालव्याच्या दुसऱ्या तोंडाशीं आहे. **पनामा कालवा**—हा १९१४ सालीं सुरू झाला. हा कालवा करण्याचें कारण अमेरिकेच्या पूर्वभागांतील लोकांना पश्चिमेकडे व पश्चिमेकडील लोकांना पूर्वेकडे येण्यास जलमार्गानें अमेरिकेच्या दक्षिण टोकास वळसा घालून यावें लागे. हा कालवा झाल्यानें ७।८ हजार मैलांचा प्रवास वांचला आहे कालव्याची लांबी ५० मैल व रुंदी ३०० फुटांपासून १००० फुटांपर्यंत आहे, हा युनायटेडस्टेटसच्या ताब्यांत आहे. हा तयार करण्यास १२५ कोटी रुपये खर्च आला आहे. हा कालवा एका पातळींत नसून त्याचें दोन्ही भाग समुद्रसपाटीच्या वर ८५ फुटांपर्यंत पायऱ्या पायऱ्यांनीं चढविले आहेत.

## २ गियाना.

या देशांत आसामसारखा जास्त पाऊस पडतो फ्रेंचगियानांत हवा रोगट आहे. या देशाचे ब्रिटिशगियाना, डचगियाना व फ्रेंचगियाना असे तीन भाग आहेत. ब्रिटिशगियानाची राजधानी जॉर्जटाऊन. **व्यापाराचें जिन्नस**—कापूस, साखर, कॉफी.

## ३. ब्राझील.

हा देश आमाझोन नदीचें खोरें असल्यामुळें त्यांत झाडी व ओल जास्त असल्यानें येथील हवा रोगट आहे. **उत्पन्न**—तांदूळ, गहूं, कापूस, तंबाखू,

कोको व कॉफी इतर कोणत्याही देशापेक्षां जास्त पिकते. देशांत जंगल फार असून त्यांत रबराचीं झाडें फार आहेत. **खनिज पदार्थ**—सोनें व हिरे पृथ्वींत येथेंच पहिल्या नंबरचे ( जास्त ) सांपडतात. **व्यापाराचे जिन्नस**—साखर, कॉफी, मटे चहा, तंबाखू , रबर, कोको; दरसाल ६० कोटींची कॉफी निर्यात होते. **शहरें**—राजधानी रीओडेझानेइरो हें उत्तम बंदर असून येथे वनस्पतींची उत्तम बाग आहे. पारा—रबराच्या व्यापाराचें बंदर. बाईआ हें देशांत नंबर २ चें बंदर आहे.

## ४ पेरु.

या देशांत ढग गडगडणें, विजा लवणें हें दृष्टीस पडत नाहीं व पाऊस अगदीं कमी पडतो. कारण मान्सूनवारे अंडीज पर्वतानें अडविले जातात. **शहरें**—राजधानी लिमा, कुथको—मूळच्या इंको लोकांची जुनी राजधानी, काल्माओ मोठें बंदर आहे.

## दक्षिण अमेरिकेंतील बाकीच्या कांहीं देशांतील प्रसिद्ध शहरें—

बोलो कोलंबियाची राजधानी व थंड हवेचें ठिकाण. किटो—इक्वेदोरची राजधानी. लापाझ बोलेवियाची राजधानी, बेलीज—ब्रिटिश हंडुरासची राजधानी, कॅरकस—व्हेनेजयेलाची राजधानी, सांतियाको—चिलीची राजधानी, ब्युनोस ऐरेस आर्जेटिनाची राजधानी, आसेन्शन—पाराग्वेची राजधानी, मॉटेव्हिडिओ—उराग्वेची राजधानी.

## ओशियानिया.

पासिफिक महासागरांतील सर्व बेटें मिळून ओशियानिया हें नांव दिलेलें आहे. यांत मेलेशिया, पोलिनिशिया, मायक्रोनीशिया, मेलेनीशिया, व ऑस्ट्रेलेशिया या द्वीपसमूहांचा समावेश होतो.

## मेलेशिया.

यांत बोर्निओ, सेलिबीज, फिलिफाइन, मोलक्का व संडा बेटें यांचा अंतर्भाव होतो. हा प्रांत ज्वालामुखी पर्वतांचा डोंगराळ आहे. येथें नेहमीं भूकंप होतात. सर्वांत मोठा ज्वालामुखी ५ मैल व्यासाचा आहे, **पिकें**—तांदूळ, साबूदाणा, ऊस, कॉफी, नीळ, मसाल्याचे पदार्थ;—**खनिज पदार्थ**—सोनें, हिरे, दगडीकोळसा; सुंदर पंखांचीं पाखरें या प्रदेशांत पुष्कळ आहेत, **लोक**—मुसलमानी धर्माचे मलाई

लोक या देशांत राहातात ते दयावर्दीपणांत व चांचेपणांत हुशार आहेत. त्यांचीं घरें कळकाचीं असतात.

## १ संडाबेटें

यांत सुमात्रा, जावा व त्यालगतचीं लहान बेटें यांचा समावेश होतो. हीं डचांचे ताब्यांत आहेत. सुमात्रा बेटांत पाडांग व बेनकूलन हीं ठाणीं आहेत. जावा. बेटांत बटोव्हिया राजधानीचें शहर आहे. यांत ४० ज्वालामुखी पर्वत आहेत.यांत कॉफी, सिंकोना, साखर, मिरीं, यांचें पीक पुष्कळ होतें.

## २ बोर्निओ

यातील बहुतेक भाग डचांचे ताब्यांत आहे. याचा साराबाकभाग ब्रुक नांवाच्या इंग्लिशराजाच्या, उत्तर बोर्निओ इंग्लिश कंपनीच्या व ब्रुनाय हें संस्थान एका सुलतानाच्या ताब्यांत आहे. ३ सेलिबीज—हीं डचांचे ताब्यांत आहेत. **मोलकाबेटें** ( मसाल्याचीं बेटें ) हीं डचांचे ताब्यांत आहेत. यांत लवंगा, जायफळ व जायपत्री यांचें उत्पन्न मोठें होतें. बांडा बेटांत जायफळांचीं झाडें पुष्कळ आहेत. या देशांत डॅक नांवाचे लोक शत्रूचें मुंडकें वधूला अर्पण केल्या. शिवाय वराचें लग्न लावीत नाहींत. **फिलिपाइन बेटें**—हीं युनायटेडस्टेट्मचे ताब्यांत आहेत. मानिला हें राजधानीचें शहर आहे. येथें चिरूट चांगले होतात. या बेटांत वाघ चांगला बळकट होतो.

## ऑस्ट्रलेशिया

ऑस्ट्रलेशियांत ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व जवळचीं बेटें यांचा समावेश होतो.

## ऑस्ट्रेलिया.

हें बेट जगांत मोठें आहे. लहानसें खंडच आहे. ह्याला पांचवें खंड म्हणतात. यांतील कांहीं जनावरें दोन पायांनीं चालतात, कांहीं जनावरें अंडीं घालतात. चेरी फळाच्या बिया फळाच्या बाहेर असतात. राजहंसपक्ष्यांचा रंग काळा असतो. **स्वाभाविकरचना**—पूर्वेकडील पर्वतांच्या रांगे जवळील व पश्चिमार्धांतील प्रदेश उंच आहे.मिरेनदीचें खोरें व किनाऱ्या जवळचा प्रदेश सखल आहे उंच पर्वत आल्प्स आहेत. आस्ट्रेलियन आल्प्स व ब्ल्युमाउंटन (नीलगिरी) हे उंच पर्वत आहेत. **आखातें**—गल्फऑफ कार्पेटेरिया-शार्क; **उपसागर**, ग्रेट आस्ट्रेलियनबाइट ग्रेट बेरिअर रीफ. **नद्या**—मरेही एकच मोठी नदी आहे. **सरोवरें**—टॉरेन्स व

एअर हीं खाऱ्यापाण्याचीं सरोवरें आहेत. **हवामान**—उत्तरेकडे उष्ण व दक्षिणेकडे साधारण उष्ण आहे. आपल्या इकडे उन्हाळा असतो तेव्हां तिकडे हिवाळा व इकडे हिवाळा असतो तेव्हां तिकडे उन्हाळा असतो. **उत्पन्न**—प्रदेश निर्जल म्हणून नापिक आहे. गहूं, सातू, ओट, ताग, द्राक्षें. **खनिजपदार्थ**—सोनें, रुपें, तांबें, कथील, दगडीकोळसा. दरसाल १५ कोटींचें सोनें निघतें. **प्राणी**—मेंढरें व कांगारू—कांगारूच्या पोटाशीं पोरें ठेवण्याची पिशवी असते. एकेका जवळ पांच पांच लाख मेंढ्या असतात. व त्यांच्या लोंकरीचें उत्पन्न दरसाल १२।१५ लाख होतें. **व्यापार–आयात**—धान्य, चहा, कापड. **निर्यात**—सोनें, तांबें, जस्त, गहूं, घोडे, कातडीं इ० **इतिहास**—१८ व्या शतकाच्या अखेरीस कुक नांवाच्या खलाशानें या खंडाचा शोध लाविला. पुढें यांत इंग्लिशांचे काळ्या पाण्याचे कैदी पाठवीत. तेव्हांपासून तेथें इंग्लिश वसाहत झाली. याचे **विभाग व त्यांच्या राजधान्या**—१ व्हिक्टोरिया–मेलबर्न. २ न्यू साउथवेल्स–सिड्नी. ३ क्वीन्सलंड–ब्रिस्बेन, ४ साउथआस्ट्रेलिया–ॲडिलेड. ५ वेस्ट-ऑस्ट्रेलिया–पर्थ. ६ टास्मेनिया–होबर्ट. ७ नार्दर्नटेरिटरीज–यांत फारच पातळ वस्ती आहे.

---

## न्यूझीलंड.

**स्वाभाविक रचना**—मध्यभागीं उत्तरदक्षिण पर्वतांची ओळ असून आसपास सखल प्रदेश आहे. ज्वालामुखी व उन्हाळीं पुष्कळ आहेत. उन्हाळ्याचें पाणी भात शिजण्याइतकें उष्ण असतें. **हवामान**—हवा इंग्लंडसारखी पण थोडी कमी थंड. आनंदकारक आहे. **पीक**—पाऊस बेताचा पडतो. पीक गहूं, कौरी नांवाची लाख. **खनिज पदार्थ**—सोनें, रुपें, तांबें, दगडी कोळसा; **लोक**—मूळचे माओरी आहेत. ते पूर्वी मनुष्याचें मांस खात. हल्लीं ब्रिटिशांची वस्ती आहे. **व्यापार–निर्यात**—सोनें, लोंकर, कातडीं, लोणीं इ०

**शहरें**—राजधानी वेलींग्टन. पूर्वीची राजधानी ऑक्लंड.

## पालिनिशिया.

यांत सांडविच बेटें, सामोआ अथवा नॅव्हिगेटर बेटें, फ्रेंडली अथवा टोंगा बेटें व सोसायटी बेटें हीं मुख्य होत. यांत ज्वालामुखी पर्वत बरेच आहेत. **हवा**–हवा सम आहे. **उत्पन्न**–केळीं, रताळीं, नारळ. **लोक**–मलाई जातीचे

३५९४

असून मनुष्याचें मांस खाणारे आहेत. **सांडविच बेटें**-हीं ह्या प्रांतांत असून हल्लीं युनायटेडस्टेटसच्या ताब्यांत आहेत. राजधानी होनोलुलू. या बेटांत मौनालोआ हा मोठा ज्वालामुखी पर्वत आहे. टोंगा किंवा फ्रेंडली बेटें, नॉव्हिगे (खलाशी) बेटें यांतले लोक दर्यावर्दीपणांत हुषार आहेत. **सोसायटी** बेटे ताहिटी हें मोठें आहे.

## मायक्रोनीशिया.

मायक्रोनशिया याचा अर्थ लहान बेट. यांत कॅरोलाईन व लाड्रोन अथवा मेरिआन बेटें हीं मुख्य होत.

## मेलॅनीशिया.

या बेटांत काळे लोक आहेत म्हणून यास कृष्णद्वीप=मेलॅनीशिया हें नांव पडलें आहे. ह्यांत फिजी बेटें, न्यूब्रिटन, न्यूगिनी अथवा पापुआ, न्यूहेब्रेडीज, न्यूकॅलिडोनिया, सालोमन बेटें हीं मुख्य आहेत. **फिजी बेटें**—यांतील लोक ख्रिस्ती धर्माचे व नरमांस भक्षक आहेत. उत्पन्न—नारळ, ऊस ह्याचें उत्पन्न मोठें आहे. येथें हिंदू मजूर गेले आहेत. **न्यूगिनी अथवा पापुआ—हें** ह्या सर्व बेटांत मोठें आहे. हें जगांत तिसऱ्या नंबरचें आहे. यांतील पशूंना पोटाखालीं पोरें ठेवण्यास पिशवी असते. यांत नंदनवनांतील पक्षी नांवाचे सुंदर पक्षी आहेत. मुख्य शहर व बंदर पोर्ट मोर्सबी.

## अंटार्क्टिका

दक्षिण ध्रुवाजवळ हा प्रांत सांपडला आहे. त्याला हें नांव दिलें आहे. यांत मनुष्याची वस्ती नाहीं. हवा विषम व येथें कडक थंडी असते. यांत मौंट एरबेस नांवाचा प्रचंड ज्वालामुखी असुन त्याची २ हजार फूट उंच ज्वाला जाते. व **त्याचा लांबपर्यंत** सभोंवतीं प्रकाश पडतो.

**उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांची तुलना—साम्य**

१ दोन्हीं खंडें दक्षिणेकडे निमुळतीं आहेत. २ दोन्ही खंडांत पश्चिमेस उंच पर्वतांची दक्षिणोत्तर रांग आहे. ३ दोन्हींतही प्रजासत्ताक राज्यें आहेत. ४ दोन्हींचेही आकार त्रिकोणाकृति आहेत. ५ दोन्हींचेही मध्यभागीं मोठें मैदान आहे. ६ दोहोंसही पूर्वभागीं मोठा उतार आहे. ७ दोहोंतही मोठाल्या नद्या आहेत. ८ दोहोंचाही पश्चिम किनारा कमीदंतुर आहे. ९ दोहोंतीलही लोक एकाधर्माचे